# THE BOMBAY ANIMAL PRESERVATION ACT, 1954
## (Bombay LXXII of 1954)

---

## मुंबईचा जनावरांची जोपासना करण्याबाबत अधिनियम, १९५४

---

### अनुक्रमणिका.

प्रारंभिक.

कलमें.


| कलमें | | पान |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा, व्याप्ति आणि सुरूवात ... ... ... ... ... | १२५९ |
| २. | अधिनियम लागू होणें ... ... ... ... ... ... | १२५९ |
| ३. | व्याख्या ... ... ... ... ... ... ... | १२५९ |
| ४. | सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक ... ... ... ... ... ... | १२५९ |
| ५. | सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय कत्तल करण्यास मनाई ... | १२५९ |
| ६. | जनावरांची कत्तल, त्या कारणासाठीं निर्दिष्ट न केलेल्या जागांत करण्यास मनाई ... | १२६० |
| ७. | जागेंत प्रवेश करण्याचा व जागेची तपासणी करण्याचा अधिकार ... ... ... | १२६० |
| ८. | शास्ति ... ... ... ... ... ... ... | १२६० |
| ९. | या अधिनियमान्वयेंचे अपराध संज्ञेय असणें ... ... ... ... | १२६० |
| १०. | अपराध करण्यास मदत करणें व अपराध करण्याचा प्रयत्न करणें ... ... | १२६१ |
| ११. | ह्या अधिनियमान्वयें अधिकार चालविणारे इसम लोकसेवक म्हणून समजणें ... | १२६१ |
| १२. | अधिनियम किंवा नियम याअन्वयें सद्भावनापूर्वक काम करणाऱ्या इसमांचा बचाव ... | १२६१ |
| १३. | ह्या अधिनियमान्वयें माफी ... ... ... ... ... ... | १२६१ |
| १४. | अधिकार सोंपविणें ... ... ... ... ... ... ... | १२६१ |
| १५. | नियम करण्याचा अधिकार ... ... ... ... ... ... | १२६१ |
| १६. | सन १९४८ चा मुंबईचा जनावरांची जोपासना करण्याबाबत अधिनियम रद्द करणें ... | १२६२ |
| | अनुसूचि. | |

# सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७२*

[मुंबईचा जनावरांची जोपासना करण्याबाबत अधिनियम, १९५४]

[१४ डिसेंबर १९५४]

## दुधदुभत्यासाठीं, पैदाशीसाठीं किंवा शेतकीच्या कारणांसाठीं योग्य अशा जनावरांची जोपासना करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, दुधदुभत्यासाठीं, पैदाशीसाठीं किंवा शेतकीच्या कारणांसाठीं योग्य अशा जनावरांची जोपासना करण्याविषयीं तरतूद करणें इष्ट आहे त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पांचव्या वर्षी याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे:—

(१) ह्या अधिनियमास मुंबईचा जनावरांची जोपासना करण्याबाबत अधिनियम, १९५४, असें म्हणावें. लघुसंज्ञा व्याप्ति आणि सुरुवात.

(२) तो सर्व मुंबई राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य सरकार, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें याबाबत जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. (१) हा अधिनियम प्रथमतः अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या जनावरांना लागू होईल. अधिनियम लागू होणें.

(२) राज्य सरकारास, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें त्याच्या मतें जोपासना करण्यास इष्ट असेल अशा कोणत्याहि इतर जनावराला या अधिनियमाचे उपबंध लागू करण्याचा अधिकार आहे.

३. विषयांत किंवा संदर्भांत एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास ह्या अधिनियमांत,— व्याख्या.

(१) "जनावर" या संज्ञेचा अर्थ, ज्या जनावरास हा अधिनियम लागू आहे तें जनावर, असा समजावा ;

(२) "सक्षम प्राधिकारी" या संज्ञेचा अर्थ ह्या अधिनियमान्वयें सक्षम प्राधिकाऱ्याचीं कामें पार पाडण्यासाठीं कलम ४ अन्वयें नेमलेला इसम किंवा इसमांचा वर्ग, असा समजावा ;

(३) "विहित केलेलें" या संज्ञेचा अर्थ, हा ह्या अधिनियमान्वयें केलेल्या नियमांनी विहित केलेलें, असा समजावा ;

(४) "अनुसूचि" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमास जोडलेली अनुसूचि, असा समजावा.

४. राज्य सरकारास, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा स्थानिक प्रदेशासाठीं ह्या अधिनियमान्वयें सक्षम प्राधिकाऱ्याचीं कामें पार पाडण्याकरितां एखाद्या इसमाची किंवा इसमांच्या वर्गाची नेमणूक करण्याचा अधिकार आहे. सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक.

५. (१) त्या त्या वेळीं कोणताहि अधिनियम अंमलांत असला किंवा कोणतीहि विरुद्ध वहिवाट असली तरीहि, कोणत्याहि इसमानें, त्या प्रदेशाकरितां नेमलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्या जनावरासंबंधी तें कत्तल करण्यास योग्य आहे अशा अर्थाचें प्रमाणपत्र मिळविल्याखेरीज कोणत्याहि जनावराची कत्तल करतां किंवा करवितां कामा नये. सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय कत्तल करण्यास मनाई.

(२) सक्षम प्राधिकाऱ्याच्या मतें जर,—

(अ) सदरहू जनावर, मग तें नर असो किंवा मादी असो (वाहन) ओढण्याच्या किंवा कोणत्याहि प्रकारच्या शेतीच्या कामाकरितां उपयोगी असेल किंवा उपयोगी असण्याचा संभव असेल;

(ब) सदरहू जनावर, नर असल्यास, पैदाशीच्या कारणाकरितां उपयोगी असेल किंवा उपयोगी असण्याचा संभव असेल ;

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

(क) सदरहू जनावर, मादी असल्यास, दूध देण्याच्या किंवा गर्भ धारण करण्याच्या कारणाकरितां उपयोगी असेल किंवा उपयोगी असण्याचा संभव असेल;

तर पोट-कलम (१) अन्वयें कोणतेंहि प्रमाणपत्र देतां कामा नये.

(३) कन्याकुन्या धार्मिक कारणाकरितां पंधरा वर्षांच्या वर वय असलेल्या कोणत्याहि जनावराची कत्तल करण्यास या कलमांतील कोणताहि मजकूर लागू असणार नाहीं.

परंतु सक्षम प्राधिकाऱ्याकडून अशा कत्तलीकरिता लेखी प्रमाणपत्र मिळविलें असलें पाहिजे.

(४) राज्य सरकारास, ह्या कलमान्वयें कोणतेंहि प्रमाणपत्र देण्याबाबत किंवा देण्याचें नाकारण्या-बाबत सक्षम प्राधिकाऱ्यानें केलेल्या कोणत्याहि आदेशाच्या वैधतेबद्दल किंवा योग्यपणाबद्दल स्वतःची खात्री करून घेण्याच्या कारणाकरितां कोणत्या वेळीं प्रकरणाच्या दफ्तराची मागणी करण्याचा आणि तपासणी करण्याचा अधिकार असेल आणि त्यासंबंधीं त्यास योग्य वाटेल असा आदेश देण्याचा देखील अधिकार आहे.

(५) या कलमान्वयेंचे प्रमाणपत्र विहित केलेल्या नमुन्यांत आणि विहित केलेली फी दिल्यानंतर देण्यांत येईल.

(६) पोट-कलम (४) च्या उपबंधांस अधीन राहून प्रमाणपत्र देण्याबाबत किंवा देण्याचें नाकारण्या-बाबत सक्षम प्राधिकाऱ्यानें दिलेला कोणताहि आदेश आणि पोट-कलम (४) अन्वयें राज्य सरकारनें दिलेला कोणताहि आदेश अखेरचा असेल व त्यावर कोणत्याहि न्यायालयांत हरकत घेतां कामा नये.

**जनावरांची कत्तल, त्या कारणासाठीं निर्दिष्ट न केलेल्या जागांत करण्यास मनाई.**

६. ज्या जनावराच्या संबंधांत कलम ५ अन्वयें प्रमाणपत्र देण्यांत आलें असेल त्या जनावराची याबाबत राज्य सरकार नेमील अशा प्राधिकाऱ्यानें किंवा अधिकाऱ्यानें निर्दिष्ट केलेल्या जागेव्यतिरिक्त इतर कोणत्याहि जागेंत कत्तल करतां कामा नये.

**जागेंत प्रवेश करण्याचा व जागेची तपासणी करण्याचा अधिकार.**

७. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरितां, जेथें या अधिनियमान्वयें अपराध केला गेला आहे किंवा केला जाण्याचा संभव आहे असें वाटण्यास सक्षम प्राधिकाऱ्यास किंवा सक्षम प्राधिकाऱ्यानें याबाबत अधिकार दिलेल्या कोणत्याहि इसमास (ज्याचा यांत यापुढें अधिकृत इसम असा उल्लेख केला आहे) कारण आहे, त्या कोणत्याहि जागेंत प्रवेश करण्याचा आणि त्याची तपासणी करण्याचा सक्षम प्राधिकाऱ्यास किंवा अधिकृत केलेल्या इसमास अधिकार आहे.

(२) अशा कोणत्याहि जागेचा भोगवटा करणाऱ्या प्रत्येक इसमानें उपरिनिर्दिष्ट कारणांकरितां आवश्यक असेल अशा जागेंत प्रवेश करण्याची परवानगी सक्षम प्राधिकाऱ्यास किंवा अधिकृत केलेल्या इसमास दिली पाहिजे आणि सक्षम प्राधिकाऱ्यानें किंवा अधिकृत इसमानें विचारलेल्या कोणत्याहि प्रश्नांचें उत्तर त्याच्या पूर्ण माहितीप्रमाणें व समजुतीप्रमाणें त्यानें दिलें पाहिजे.

**शिक्षा.**

८. जो कोणीहि इसम ह्या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याहि उपबंधाचें उल्लंघन करील त्यास, तो दोषी ठरविण्यांत आला असतां, पराकाष्ठा सहा महिने मुदतीची कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**या अधि-नियमा-खालील अपराध संज्ञेय असणें.**

९. दंड प्रक्रिया संहिता, १८९८, यांत कांहीं असलें तरीहि ह्या अधिनियमान्वयेंचे सर्व अपराध संज्ञेय असतील.

१०. जो कोणी ह्या अधिनियमान्वयें शिक्षेस पात्र असा कोणताहि अपराध करण्यास मदत करील किंवा असा कोणताहि अपराध करील त्यास, अशा अपराधासाठीं ह्या अधिनियमान्वयें विहित केलेली शिक्षा होईल.

अपराध करण्यास मदत करणें व अपराध करण्याचा प्रयत्न करणें.

११. ह्या अधिनियमान्वयें अधिकार चालविणारें सर्व इसम, भारतीय दंड संहितेचे कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असें समजलें पाहिजे.

ह्या अधिनियमान्वयें अधिकार चालविणारें लोकसेवक म्हणून समजणें.

१२. ह्या अधिनियमान्वयें किंवा त्यानुसार केलेल्या नियमान्वयें सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याहि इसमाविरुद्ध कोणताहि दावा, खटला अथवा वैध कारवाई करतां कामा नये.

अधिनियम किंवा नियम याअन्वयें सद्भावनापूर्वक काम करणाऱ्या इसमांचा बचाव.

१३. या बाबतीत विहित केलेल्या कोणत्याहि शर्तीस अधीन राहून, हा अधिनियम पुढील जनावरांस लागू असणार नाहीं.—

ह्या अधिनियमान्वयें माफी.

(१) राज्य सरकारनें स्थापन केलेल्या, चालविलेल्या किंवा मान्यता दिलेल्या संस्थेंत, देवीची लस किंवा लस यासाठीं किंवा कोणत्याहि प्रयोगाच्या किंवा संशोधनाच्या कारणासाठीं शस्त्रक्रिया केलेलें कोणतेंहि जनावर,

(२) पुढील कोणतेंहि जनावर किंवा जनावरांचा वर्ग—

(१) राज्य सरकारनें याबाबत अधिकार दिलेल्या पशुवैद्यक व्यवसायीनें सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टीनें त्याची कत्तल करणें आवश्यक आहे असें प्रमाणपत्र दिलेलें.

(२) सांसर्गिक किंवा इतर जनावरांना धोक्याचा म्हणून पशुवैद्यक व्यवसायीनें प्रमाणपत्र दिलेल्या, कोणत्याहि रोगानें पीडित असलेलें.

१४. राज्य सरकारास, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें—कलम ४ अन्वयेचे आपले अधिकार हे,—

अधिकार सोपविणें.

(१) स्थानिक क्षेत्रांतील कोणत्याहि स्थानिक प्राधिकाऱ्याकडे त्याच्या क्षेत्राधिकारास अधीन राहून सोंपविण्याचा,

(२) कलम (५) पोट-कलम (४) अन्वयेचे आपले अधिकार आणि कामें राज्य सरकारच्या कोणत्याहि प्राधिकाऱ्याकडे सोंपविण्याचा, अधिकार आहे.

१५. (१) राज्य सरकारास, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे.

नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषेंकरून आणि वरील उपबंधांच्या सामान्यतेस बाध न येऊ देतां अशा नियमांत पुढील गोष्टींची तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(अ) या अधिनियमांत तरतूद केलेले अधिकार व कामें याशिवाय सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार व कामें;

(ब) कलम ५ अन्वयेंचा प्रमाणपत्राचा नमुना;

(क) कलम ५ अन्वयें भरावयाच्या फीची रक्कम ;

(ड) कलम १३ अन्वयें ज्या शर्तीस अधीन राहून अधिनियम कोणत्याहि जनावरास लागू असणार नाहीं त्या शर्ती ;

(इ) विहित केलेली किंवा करण्यांत येणारी इतर कोणतीहि बाब.

(३) या कलमान्वयें केलेलें नियम राजपत्रांत आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस पात्र असतील.

सन १९४८ चा मुंबईचा जनावरांची जोपासना करण्याबाबत अधिनियम रद्द करणें.

१६. मुंबईचा जनावरांची जोपासना करण्याबाबत अधिनियम, १९४८, हा याअन्वयें रद्द करण्यांत येत आहे,—परंतु—

(अ) अशा रीतीनें रद्द केलेल्या अधिनियमाच्या उपबंधान्वयें केलेली कोणतीही नेमणूक, नियम किंवा अर्ज, काढलेली कोणतीहि अधिसूचना किंवा दिलेलें कोणतेहि प्रमाणपत्र, मान्यता किंवा आदेश या सर्व गोष्टी ह्या अधिनियमान्वयें केलेली कोणतीहि नेमणूक, नियम किंवा अर्ज, काढलेली कोणतीहि अधिसूचना किंवा दिलेलें कोणतेहि प्रमाणपत्र, मान्यता किंवा आदेश यान्वयें रद्द करण्यांत आलेल्या नसतील तर व रद्द करण्यांत येईपर्यंत ह्या अधिनियमाशीं विसंगत नसेल तेथवर त्या ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वयें केलेली नेमणूक, काढलेली अधिसूचना किंवा दिलेली प्रमाणपत्रें आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे.

(ब) अशा रीतीनें रद्द केलेल्या अधिनियमाच्या उपबंधान्वयें शिक्षेस पात्र अशा कोणत्याहि अपराधाच्या न्यायचौकशीच्या संबंधींचें कोणतेंहि काम, उक्त अधिनियम रद्द केला नव्हता परंतु तो अंमलांत होता असें समजून चालू ठेवण्यांत व पुरें करण्यांत आलें पाहिजे आणि अशा कामकाजांत बसविलेला कोणताहि दंड अशा रीतीनें रद्द केलेल्या अधिनियमान्वयें वसूल करण्यांत आला पाहिजे.

## अनुसूची

[कलम २ (१)]

गुरें (बैल, खच्ची केलेले बैल, गाई, वासरें, म्हशी व रेडे आणि रेडकें).

# THE BOMBAY CO-OPERATIVE SOCIETIES (AMENDMENT) ACT, 1954

## (Bom. LXXIII of 1954)

## मुंबई सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९५४

अनुक्रमणिका

प्रस्तावना.

कलमें.

| | | पान |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा ... ... ... ... ... | १२६५ |
| २—११. | या कलमान्वयें केलेल्या सुधारणांचा सन १९२५ चा मुंबई सहकारी संस्था अधिनियमांत समावेश करण्यांत आला आहे. | १२६५ |
| १२. | कलम ४ अन्वयें केलेल्या सुधारणेचा भूतकालसापेक्ष प्रभाव असणें ... ... | १२६५ |

J-1493—80-A.